दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | रविवार, 26 जुलै 2026 | अंक क्र. 80 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# आषाढी एकादशीनिमित्त दिंडीत सहभागी होत विठ्ठल नामाचा गजर; आज 'एक पेड पंकजाताई के नाम' वृक्षारोपणाने उपक्रमांचा समारोप

## 'एक पेड पंकजाताई के नाम' : समाजसेवा हीच खरी लोकसेवा : राजेश गित्ते (परळी तालुका भाजपाध्यक्ष)

■ परळी (प्रतिनिधी):

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, परळी तालुक्याच्या वतीने 22 ते 26 जुलै या कालावधीत विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांच्या मालिकेत शनिवार (25 जुलै) रोजी कन्हैया वारकरी शिक्षण संस्था, परळी वैजनाथ येथे वारकरी बांधवांसाठी खिचडी वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. आषाढी एकादशीनिमित्त निघालेल्या दिंडीत उपस्थित मान्यवरांनी सहभागी होत "विठ्ठल... विठ्ठल..." नामाचा गजर केला आणि भक्तिमय वातावरणात वारकऱ्यांसोबत संवाद साधला.

यावेळी परळी तालुका भाजपाध्यक्ष राजेश गित्ते यांनी समाजसेवा हीच खरी लोकसेवा असल्याचे सांगत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणारे सामाजिक उपक्रम हे जनहिताला समर्पित असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमास कन्हैया वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक ह.भ.प. गोविंद महाराज मुंडे, भाजप कोषाध्यक्ष भुराज बदने, भाजप सचिव अनिल गुट्टे, कासारवाडीचे माजी सरपंच दशरथ (दादा) गुट्टे, दैनिक परळीचे संपादक महादेव गित्ते तसेच भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, वारकरी बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, 26 जुलै रोजी "एक पेड पंकजाताई के नाम" या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करून पाच दिवस चाललेल्या समाजोपयोगी उपक्रमांचा समारोप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



## गणेशभक्तांसाठी रेल्वेची खास भेट! कोकण मार्गावर विशेष गाड्या आणि नवीन थांबे; पाहा पूर्ण वेळापत्रक

■ मुंबई : वृत्तसंस्था

गणेशोत्सव अवघ्या काही आठवड्यांवर येऊन ठेपला असताना कोकण गाठणाऱ्या चाकरमान्यांसाठी मोठी दिलासादायक बातमी आहे. मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वे प्रशासनाने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त विशेष रेल्वे आणि मेमू गाड्यांची घोषणा केली आहे. याशिवाय काही महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांना सावंतवाडी रोड स्थानकावर नियमित थांबाही देण्यात आला आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे, दिवा आणि पुणे येथून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे.



दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात मुंबई आणि उपनगरांतील लाखो चाकरमानी आपल्या मूळ गावी परततात. यंदा १४ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवासाठी रेल्वे आरक्षण आणि अतिरिक्त तिकीट खिडक्याही सुरू करण्यात आल्या आहेत. वाढती प्रवासी गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने ही विशेष व्यवस्था केली आहे.

### सावंतवाडी रोड स्थानकावर 'या' एक्स्प्रेस गाड्यांना थांबा

■ प्रशासनाच्या निर्णयानुसार, सीएसएमटी-मंगळुरू एक्स्प्रेस आणि हजरत निजामुद्दीन-तिरुवनंतपुरम राजधानी एक्स्प्रेस) या गाड्यांना २६ जुलैपासून सावंतवाडी रोड स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. तसेच एलटीटी-त्रिवेंद्रम गरीब रथ एक्स्प्रेस २७ जुलैपासून येथे थांबणार आहे. यामुळे सिंधुदुर्ग, सावंतवाडी आणि परिसरातील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.















## संपादकीय

# मेहनतीशिवाय यश नाही

विद्यार्थ्यांचे यश केवळ परीक्षेतील गुणांवर अवलंबून नसून आत्मविश्वास, नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोन यावरही तेवढेच अवलंबून असते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण मेहनत, पालक-शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध दिनचर्या अंगीकारल्यास प्रत्येक विद्यार्थी यशाचे शिखर गाठू शकतो.

उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सुरू होऊन आजचा तेरावा दिवस आहे. विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे आवश्यक आहे. तरच तो विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकतो. त्यासाठी त्यांच्या मनात स्वत:चा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. तो आत्मविश्वास पालक आणि शिक्षकवर्गाने निर्माण करायला हवा. विद्यार्थ्यांच्या जीवनात पालक आणि शिक्षक अधिक जवळचे असतात. त्यामुळे त्यांची आवडनिवड व सवय त्यांना माहीत असते. बरेच विद्यार्थी परीक्षेपर्यंत बेसावध असतात. परीक्षा जवळ आली की, रात्रीचा दिवस करून अभ्यासाला लागतात. याचा परिणाम विद्यार्थ्यांचे मन विचलित होते. पुढे काय करावे त्यांनाच समजत नाही. त्यांच्या मनावरील दडपण वाढते. याचा परिणाम त्याला कमी गुण किंवा त्या परीक्षेत अपशय येऊ शकते. यासाठी मुलांनी विद्यार्थी म्हणून यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत. तसेच अभ्यासामध्ये नियमित सातत्य ठेवावे लागेल. कठोर परिश्रम आणि अभ्यासात सातत्य ठेवण्यासाठी अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन करावे लागेल. त्यांनी या तीन गोष्टी पाळल्या, तर परीक्षेत उत्तम गुण मिळू शकतात.

आपण सहज परीक्षेत यश संपादन करू शकतो असे जरी विद्यार्थ्यांना वाटत असले तरी तितके ते सोपे नसते. मुळात त्याला शिकण्याची आवड पाहिजे. म्हणजे तो पुढे काहीतरी करू शकतो. खरे म्हणजे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाल्यावर पहिल्या सुरुवातीपासून विद्यार्थ्यांनी अभ्यासाला लागावे. शाळेमध्ये ज्या धड्याचे अध्ययन झालेले असेल त्याची घरी आल्यावर उजळणी करावी. त्या आधी पूर्ण धडा वाचावा म्हणजे आपण त्या धड्यात काय शिकणार आहोत याची कल्पना येते. त्यासाठी प्रथम विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करावे लागेल. त्याप्रमाणे रोज अभ्यास करावा म्हणजे अभ्यास करण्याची सवय लागते. तसेच विद्यार्थ्यांनी विषयांचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात ताणतणाव वाढत नाही. परीक्षेच्या वेळी अधिक उत्साहाने जातात.

आपण एक विद्यार्थी आहोत याची जाणीव त्यांना असायला हवी. शाळेची वेळ, घरातील इतर कामे आणि मोकळा वेळ गृहीत धरून विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन करावे लागेल. म्हणजे विषयांचे वेळापत्रक तयार करून दर दिवशी दिलेल्या वेळेनुसार अभ्यास करावा लागेल. या पद्धतीमुळे अभ्यासात सातत्य राहील. अभ्यास नियमितपणे केला जाईल. असे जरी असले तरी अवांतर वाचनसुद्धा अतिशय महत्त्वाचे असते. शाळेमध्ये शिक्षक अध्यापन करीत असताना लक्षपूर्वक ऐकावे. त्यातल्या काही आवश्यक मुद्द्यांचे टिपण करावे. काही शंका असल्यास बिनधास्तपणे अध्यापकांना विचाराव्यात. चुकीचे समजून घेऊ नये. यात आपलेच नुकसान आहे. म्हणजे अध्यापक वर्गात अध्ययन करीत असताना विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे. बऱ्याच वेळा धड्याखाली जे प्रश्न विचारलेले असतात तेच प्रश्न परीक्षेच्या वेळी विचारले जातात. तेव्हा त्या प्रश्नांची जी अचूक उत्तरे असतील त्याची नियमित उजळणी करणे गरजेचे असते. तसेच जे प्रश्न दिलेले असतील त्या उत्तरांची सुद्धा उजळणी व्हायला हवी. दुर्लक्ष केल्यास परीक्षेच्या वेळी जर तो प्रश्न विचारला गेल्यास अचूक उत्तर आपण लिहू शकत नाही. तेव्हा विषयाचे अध्ययन जरी झाले तरी प्रश्नांच्या उत्तरांची वेळच्यावेळी उजळणी करावी लागेल. म्हणजे परीक्षेला उत्तरे लिहिताना अडथळा येणार नाही. अधिक आत्मविश्वासाने परीक्षेची उत्तरपत्रिका सोडवू शकतो. हे सर्व नियमित अभ्यास आणि उजळणी केल्यामुळेच शक्य होऊ शकते.

विशेष म्हणजे प्रत्येक दिवशी सर्व विषयांची उजळणी करणे शक्य नसते. अशावेळी आपल्याला जो धडा कठीण वाटत असेल त्याचीच उजळणी करावी. म्हणजे पुढील धडा दुसऱ्या दिवशी घेता येतो. यासाठी आपले योग्य धेय्य असले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेशी झोप आणि सकस आहार दैनंदिन आहारात दिला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे लक्ष केंद्रित होते. अन्यथा मन विचलित होऊ शकते. हा निसर्गाचा नियम आहे. याची काळजी सर्व पालकांनी घेतली पाहिजे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतंत्र जागा पाहिजे. खेळती हवा, शांत वातावरण आणि पुरेसा प्रकाश असावा. अभ्यास करताना मध्येच थोडी विश्रांती घ्यावी. अभ्यासामध्ये काही शंका असल्यास शिक्षकांना विचारून वेळच्या वेळी शंकांचे निरसन करावे. हल्लीची मुले व्यसनाच्या आहारी गेलेली पाहायला मिळतात. हे टाळण्यासाठी योग्य वयात मुलांना व्यसनापासून सतर्क करणे गरजेचे आहे. संदेश देणे बंधनकारक आहे. तसेच सध्या टीव्ही बाजूला होऊन मोबाईलचा अतिरिक्त वापर होत आहे. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. तेव्हा योग्य कामासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करावा. अन्यथा मोबाईलला चार हात दूर ठेवावे. प्रत्येकाच्या जीवनात कधी यश, कधी अपयश आहे. मात्र अपयशाने खचून न जाता त्यावर मात करून पुढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी सुद्धा असेच करायला हवे. अपयशाने खचून न जाता आपला दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा.



# ग्लोबल वारीच्या समारोपाला आषाढी दिवशी लंडनला उपस्थित राहता आले, हे माझे भाग्य : धनंजय मुंडे

## ऐतिहासिक 'ग्लोबल वारी : लंडन ते पंढरपूर'चा भक्तिमय समारोप, धनंजय मुंडेंची उपस्थिती

लंडन (UK) - श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, यूके (SVRTUK) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "ग्लोबल वारी – लंडन ते पंढरपूर" या अभूतपूर्व आध्यात्मिक उपक्रमाच्या समारोपास लंडन येथे उपस्थित राहता आले, आळंदी ते पंढरपूर पालखी सोहळा सुरू असताना मला वारीत जाता आले नाही, मात्र या ग्लोबल वारीच्या समारोपास थेट लंडन मध्ये उपस्थित राहून पादुकांचे दर्शन लाभले, हे माझे भाग्य आणि पांडुरंगाची मर्जी आहे, असे प्रतिपादन लंडन ते पंढरपूर ग्लोबल वारीच्या समारोप प्रसंगी युके स्थित विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित आषाढी सोहळ्यात माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी केले आहे.

यंदाच्या वारीत श्री विठ्ठल-रुक्मिणींच्या पादुकांनी लंडनपासून ११ देशांचा प्रवास पूर्ण करून भारतात आगमन केले. त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गाने आळंदी ते पंढरपूर पायी



वारी पूर्ण करत पंढरीत प्रवेश केला. या ऐतिहासिक वारीने जगभरातील विठ्ठल भक्तांना एकत्र आणत "वसुधैव कुटुंबकम्" आणि वारकरी संप्रदायाचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचविला.

वारीच्या समारोपानिमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पादुकांचा अभिषेक, दर्शन तसेच काला कीर्तन यांसारखे धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पडले. यावेळी महाराष्ट्राचे मंत्री मा. धनंजय मुंडे यांनी उपस्थित राहून श्री विठ्ठल-रुक्मिणींच्या पादुकांचे दर्शन घेतले व आशीर्वाद प्राप्त केला. त्यांनी या अनोख्या जागतिक वारी उपक्रमाचे कौतुक करत, जगभरात वारकरी परंपरेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, यूकेच्या कार्याचे अभिनंदन केले. या ऐतिहासिक उपक्रमाला देश-विदेशातील वारकरी, विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवक आणि माध्यम प्रतिनिधी यांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले. या भक्तिमय सोहळ्यात सहभागी होऊन धनंजय मुंडे यांनी पालखी वाहिली तसेच ग्लोबल वारकऱ्यांच्या सोबतीने फुगडीचा देखील आनंद घेतला. मंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. अजित खेडकर यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पंकजाताई मुंडे : वंजारी समाजाची आण, बाण आणि शान!

■ डॉ. सुवर्णा कराड

महाराष्ट्राच्या राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे पदामुळे मोठी होत नाहीत, तर जनतेच्या विश्वासामुळे उंचावतात. लोकांच्या सुख-दु:खात सहभागी होणारे, संकटाच्या काळात धीर देणारे आणि संघर्षातून नेतृत्व घडविणारे व्यक्तिमत्त्व म्हणून पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांचे नाव आदराने घेतले जाते. वंजारी समाजाच्या अस्मितेचे, स्वाभिमानाचे आणि संघटनशक्तीचे त्या आज एक महत्त्वाचे प्रतीक बनल्या आहेत. म्हणूनच अनेक कार्यकर्त्यांच्या भावना व्यक्त करणारे शब्द आज सहजपणे उच्चारले जातात—"पंकजाताई मुंडे म्हणजे वंजारी समाजाची आण, बाण आणि शान!"

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या म्हणून त्यांची ओळख झाली खरी; परंतु काळाच्या ओघात त्यांनी स्वत:ची स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण केली. जनतेशी सातत्याने संपर्क ठेवणे, कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणे, ग्रामीण महाराष्ट्रातील प्रश्न समजून घेणे आणि विकासाला प्राधान्य देणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये मानली जातात.

२६ जुलै १९७९ रोजी परळी वैजनाथ येथे जन्मलेल्या पंकजाताईंना सार्वजनिक जीवनाचे संस्कार घरातूनच लाभले. शिक्षण पूर्ण करून त्यांनी व्यवस्थापन विषयात उच्च शिक्षण घेतले आणि समाजकारणाच्या वाटेवर सक्रियपणे पाऊल टाकले. २००९ मध्ये परळी विधानसभा मतदारसंघातून विधानसभेत निवडून येत त्यांनी विधिमंडळातील प्रवास सुरू केला. त्यानंतर ग्रामविकास, महिला व बालविकास, जलसंधारण, रोजगार हमी, सार्वजनिक आरोग्य, भूकंप पुनर्वसन यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. आज त्या महाराष्ट्र शासनात



पर्यावरण व हवामान बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री म्हणून कार्यरत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव म्हणूनही त्या संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. विधान परिषदेच्या उपसभागृह नेत्या म्हणून विधिमंडळातही त्या महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

पंकजाताईंच्या नेतृत्वाची खरी ताकद त्यांच्या जनसंपर्कात आहे. बीडसह मराठवाडा आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील कार्यकर्त्यांशी त्यांनी जपलेले आत्मीय नाते हे त्यांच्या लोकप्रियतेचे मोठे कारण मानले जाते. अनेकांना त्या केवळ नेत्या नसून कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीप्रमाणे वाटतात. कार्यकर्त्यांच्या सुख-दु:खात सहभागी होणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना धीर देणे, ही त्यांची शैली त्यांना जननेत्या म्हणून वेगळे स्थान मिळवून देते.

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर अनेकांनी त्यांच्या राजकीय वारशाचे भवितव्य काय, असा प्रश्न उपस्थित केला होता. परंतु पंकजाताईंनी संयम, धैर्य आणि चिकाटीच्या बळावर तो वारसा केवळ जपलाच नाही, तर नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम केले. भगवान बाबा यांच्या विचारांशी जोडलेली दसरा मेळाव्याची परंपरा त्यांनी पुढे नेली आणि समाजातील ऐक्याचा धागा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला.

सार्वजनिक जीवनात आव्हाने, टीका आणि वाद हे अपरिहार्य असतात. पंकजाताईंच्या राजकीय प्रवासातही काही वाद निर्माण झाले; मात्र त्यांनी आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण दिले आणि लोकशाही प्रक्रियेवर विश्वास व्यक्त करत आपले सार्वजनिक कार्य सुरू ठेवले. हा त्यांचा संयमी दृष्टिकोन त्यांच्या राजकीय प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

आज महाराष्ट्रासमोर पर्यावरण संवर्धन, हवामान बदल, शाश्वत विकास, ग्रामीण अर्थव्यवस्था, पशुसंवर्धन, महिला सक्षमीकरण आणि युवकांना रोजगार अशा अनेक महत्त्वाच्या आव्हानांचा सामना आहे. या क्षेत्रांत परिणामकारक काम करण्याची अपेक्षा जनतेला त्यांच्याकडून आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पद धारण करणे नव्हे, तर समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे होय. त्या दिशेने पंकजाताईंचा प्रवास सुरू आहे.

वंजारी समाजासाठी त्या स्वाभिमानाचे प्रतीक आहेत; तर असंख्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणेचा स्त्रोत आहेत. संघर्षातून उभे राहून नेतृत्व सिद्ध करता येते, जनतेचा विश्वास जपता येतो आणि सेवाभावातून समाजाशी नाते अधिक दृढ करता येते, याचे उदाहरण म्हणजे पंकजाताई मुंडे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड कार्यशक्ती आणि समाजसेवेच्या कार्यात अधिकाधिक यश लाभो, हीच मन:पूर्वक सदिच्छा. पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**■ डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**

# लोककल्याणकारी सेवा पंधरवाडा

## ना पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त आज महिला बचत गट व फेरीवाल्यांना कर्ज वाटप

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री धनंजय मुंडे आणि पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्तनगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने सुरू असलेल्या 'लोककल्याणकारी सेवा पंधरवडा' अंतर्गत आज रविवार, २६ जुलै रोजी महिला बचत गट तसेच फेरीवाला लाभार्थ्यांना कर्ज वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज २६ जुलै रोजी दुपारी १ वा. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे महिला मेळावा, महिला बचत गट व फेरीवाल्यांना कर्ज वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात विविध महिला बचत गट आणि फेरीवाल्यांना बँकांमार्फत मंजूर झालेल्या कर्जाचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच बँकांकडून घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांचा




सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. १५ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी सेवा पंधरवड्या अंतर्गत विविध जनकल्याणकारी उपक्रम सुरू आहेत. नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी नगर परिषद सातत्याने प्रयत्नशील आहे.

महिला बचत गट व फेरीवाल्यांना कर्ज वाटप व सन्मान कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, महिला व बालकल्याण सभापती सौ.अंजली बनसोडे (माळी), मुख्याधिकारी पी. एन.निगळ,नगर परिषदेचे सर्व सभापती, नगरसेवक व नगरसेविका यांनी केले आहे.

# मुसळधार पावसाने सातशे कुटुंब बेघर ; पूरस्थितीने अनेकांचे स्थलांतर

■ नाशिक प्रतिनिधी

जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाने जिल्हातील जवळपास सर्वच धरणे तुडुंब भरली आहे. ज्यामुळे अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणीपातळीत देखील वाढ झाली आहे. पाणीपातळीत वाढ झाल्याने निफाड तालुक्यातील चांदोरी आणि सायखेड्यात पूरस्थिती निर्माण होऊन शेकडो कुटुंबीयांवर बेघर होण्याची वेळ आलीय. तर चांदोरीत तब्बल ४०० कुटुंबांचे तर सायखेड्यात २५० कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले आहे. चांदोरीत या पुरामुळे तब्बल १०० तर सायखेड्यात १२५ दुकानांमधील मालाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**मुसळधार पावसाने सातशे कुटुंब बेघर**

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदमचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार सोबतच ग्रामीणच्या अपर पोलिस अधीक्षक विमला एम. यांनी पूरग्रस्त भागाला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी पूरग्रस्त भागात काही ठिकाणी पाणी साचल्यामुळे वाहनांची वाहतूक शक्य नसल्याने सीईओ पवार यांनी थेट ट्रॅक्टरवरून पूरग्रस्त भागात जाऊन नागरिकांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती घेतली. यानंतर सर्व विभाग प्रमुख, आपत्ती व्यवस्थापन समिती तसेच संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत पूरग्रस्त नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च



प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी ग्रामपंचायतीमार्फत सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आलेल्या कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या राहण्याच्या व इतर आवश्यक सुविधांची पाहणी करण्यात आली.

## जायकवाडीच्या विसर्गावर आमदार देवयानी फरांदे संतप्त

नाशिकमधून जायकवाडी धरणाकडे नेमके किती पाणी सोडण्यात आले? जून महिन्यात जायकवाडीतील पाणीसाठा किती होता? आणि या विसर्गावर नियंत्रण नेमके कोणाचे आहे? अशा प्रश्नांची सरबत्ती करत आमदार देवयानी फरांदे यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. नाशिककरांच्या हक्काच्या पाण्याबाबत माहिती लपवली जात असल्याचा आरोप करत, यापुढे कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

### अधिकृत आकडेवारी न मिळाल्याने संतप्त

जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून तब्बल ९४ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. हे पाणी जायकवाडी धरणात प्रत्यक्षात किती पोहोचले, याची अधिकृत आकडेवारी मागितल्यानंतर प्रशासनाकडे त्याची माहितीच उपलब्ध नसल्याचे समोर आले. यावर संतप्त होत आमदार देवयानी फरांदे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. नाशिकमधून सोडल्या जाणाऱ्या पाण्याचा हिशेबच नसणे ही गंभीर बाब असून, अधिकारी आकडेवारी लपवत असल्याचा आरोप त्यांनी केला. जायकवाडी धरणात सध्या अवघा ३१ टक्के पाणीसाठा आहे. त्यातील २४ टक्के मृतसाठा वजा केल्यानंतर उपयुक्त पाणीसाठा अत्यल्प राहतो. अशा परिस्थितीत मृतसाठ्याचा नियमबाह्य वापर झाला आहे का, याची चौकशी करण्याची मागणी फरांदे यांनी केली.

नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचीही त्यांनी मागणी केली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# वादळांशी लढणं ज्यांच्या रक्तात, अन्यायाशी भिडणं ज्यांच्या वृत्तीत

# लोकनेत्या

# मा. ना. पंकजाताई मुंडे



**ताईसाहेब म्हणजेच ना.पंकजाताई मुंडे...**

**वादळांशी लढणं ज्यांच्या रक्तात आहे, अन्यायाशी भिडणं ज्यांच्या वृत्तीत आहे.**

**रणांगण असो की जनतेचा दरबार, पंकजाताईंचा प्रत्येक निर्णय ठरतो महाराष्ट्राचा आधार.**

**महाराष्ट्राच्या राजकारणातला एक वलयांकित चेहरा..एक दमदार, कणखर, आक्रमक व तितकच संयमी नेतृत्व म्हणूनही महाराष्ट्र त्यांना ओळखतो. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सक्षम राजकीय वारसा समर्थपणे पुढे घेऊन जात असताना राजकारणा सोबतच समाजकारणातही कायम आघाडीवर असलेलं हे उमदे व्यक्तीमत्व..**

समाजातील वंचित, पिडित घटकांच्या सेवेसाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले, त्या मुंडे साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांचे अधुरे स्वप्न पुर्ण करण्याचा ध्यास घेत, येणा-या प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारे  हे धुरंधर नेतृत्व आज सर्व सामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे. ना. पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकीर्द सुरवातीपासून तशी संघर्षाचीच.. या संघर्षावर स्वकर्तृत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला.  एक सरळमार्गी राजकारणी, जनतेच्या अडी- अडचणीला धावून जात त्यांच्या वेदना समजून घेण्याचं काम त्यांनी सातत्यानं केलं आणि करत आहेत.  महाराष्ट्रातील लाखो- करोडो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी अन् प्रेमाची भावना आहे, हिच शक्ती त्यांना उर्जा देऊन जाते. नेतृत्व हे केवळ पदाने मोठे होत नाही, तर जनतेच्या विश्वासाने, संघर्षाने आणि विकासासाठी घेतलेल्या निर्णयांनी ते उंचावत असते. " महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे (ताईसाहेब) यांचा २६ जुलै हा वाढदिवस म्हणजे लाखो कार्यकर्ते, शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य जनतेसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा दिवस आहे.









**ना.पंकजाताई मुंडे ताईसाहेब** या केवळ बीड जिल्ह्याच्या नेत्या नाहीत, तर त्या संपूर्ण महाराष्ट्राच्या लोकनेत्या आहेत. त्यांच्या धाडसी नेतृत्वामुळे, अभ्यासू स्वभावामुळे आणि जनसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे त्या आज "रणरागिणी" आणि "महाराष्ट्राची वाघीण" म्हणून ओळखल्या जातात. संकट कोणतेही असो, निर्णय कितीही कठीण असो, जनहिताचा विचार प्रथम ठेवून ठामपणे उभे राहण्याची त्यांची कार्यशैली सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांनी महाराष्ट्राला संघर्ष, सामाजिक न्याय आणि जनसेवेचा जो महान वारसा दिला, त्याच वारशाला ना.पंकजाताई यांनी अत्यंत समर्थपणे पुढे नेले आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न हा त्यांच्या कार्याचा खरा गाभा आहे.

**2014 मध्ये भारतीय जनता पार्टीच्या** सत्तेत त्यांना जलसंधारण आणि ग्रामविकास महिला व बालविकास मंत्रीपदाची संधी मिळाली. महाराष्ट्रात "गाव तिथे विकास" हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून, त्यांनी प्रत्येक गावात निधी वळवला. जलसंधारणाची मोठी कामे करून, राज्याला सुजलाम सुफलाम केले. प्रत्येक गावात पाणी, रस्ते, शाळा आणि आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. हे काम फक्त राजकीय नव्हते, तर ते एका मातृहृदयाचे होते, जे आपल्या राज्याच्या प्रत्येकाला सुखी पाहायचे होते. आज, 2026 मध्ये ना.पंकजाताई पुन्हा एकदा पर्यावरण, पशु संवर्धन व वातावरणीय बदल मंत्री म्हणून महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीपदी विराजमान आहेत आहेत आणि जनसामान्यांची सेवा करत आहेत.

**ना.पंकजाताई मुंडे ताईसाहेब यांचे नेतृत्व** म्हणजे विकास, अभ्यास, संवेदनशीलता आणि संघर्ष यांचा सुंदर मिलाफ आहे. सभागृहातील प्रभावी मांडणी असो, मंत्रालयातील निर्णयक्षमता असो किंवा गावागावातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या ऐकण्याची तळमळ असो, प्रत्येक ठिकाणी त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे धैर्य, कर्तृत्व आणि लोकसेवेचे प्रेरणास्थान आहे. महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे (ताईसाहेब) यांनी विकास, पर्यावरण संरक्षण आणि पारदर्शक प्रशासन यांचा सुंदर समन्वय साधत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण संवर्धन, पशुधन विकास आणि प्रशासनातील सुधारणा या तिन्ही क्षेत्रांमध्ये राज्याने नवी दिशा मिळवली आहे.

## पर्यावरण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण दिशा पर्यावरणपूरक प्रशासनाची प्रभावी सुरुवात-

२०२४ ते २०२६ या कालावधीत महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणाला अधिक प्राधान्य देत अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांवर भर दिला. राज्यातील हवा, पाणी आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण, सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था अधिक प्रभावी करणे, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकविरोधात जनजागृती, तलाव व जलस्रोतांचे संवर्धन, औद्योगिक प्रदूषणावर नियंत्रण, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पर्यावरणपूरक उपाययोजनांना गती देण्याचे प्रयत्न करण्यात आले. हवामान बदल आणि वाढते कार्बन उत्सर्जन ही जगासमोरील मोठी आव्हाने लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने पर्यावरणपूरक प्रशासनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. शासकीय कामकाजात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. या माध्यमातून इंधनावरील अवलंबित्व कमी करणे, कार्बन उत्सर्जन घटविणे आणि हरित ऊर्जेला चालना देणे होय. पर्यावरण संरक्षण ही केवळ घोषणा न राहता शासनाच्या दैनंदिन कामकाजाचा अविभाज्य भाग व्हावा, यासाठी हरित प्रशासनाची संकल्पना अधिक बळकट करण्यात आली. भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, निरोगी आणि प्रदूषणमुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या दिशेने हा निर्णय अत्यंत दूरदृष्टीचा मानला जात आहे.

## पशुसंवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. पशुपालकांना आर्थिक बळ देण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना, पशुपालकांना व्याजदर सवलतीसारखे निर्णय, पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम करणे, तालुका स्तरावर घरपोच पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यावर भर, पशुवैद्यकीय दवाखाने आणि प्रयोगशाळा मजबूत करणे, गोशाळांचे सक्षमीकरण, चारा विकास कार्यक्रम, स्थानिक जनावरांच्या संगोपनाला प्रोत्साहन आणि पशुपालकांसाठी विविध सहाय्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. शेतकरी आणि पशुपालकांचे उत्पन्न वाढविणे, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करणे आणि पशुधनाच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणे, ही या काळातील शासनाची महत्त्वाची दिशा राहिली.  देशी गोमातेला 'राज्यमाता गोमाता'चा सन्मान - पशुसंवर्धन क्षेत्रात ऐतिहासिक ठरलेला निर्णय म्हणजे देशी गोवंशाला 'राज्यमाता गोमाता' हा सन्माननीय दर्जा देणे. भारतीय संस्कृती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी व्यवस्थेचा आधार असलेल्या देशी गोवंशाच्या संरक्षणासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरला. या निर्णयानंतर देशी जातींच्या संवर्धनासाठी प्रजनन कार्यक्रमांना अधिक गती देण्यात आली. व्यापक लसीकरण मोहीम, जाती सुधार कार्यक्रम, पशू आरोग्य सेवा, आधुनिक कृत्रिम रेतन सुविधा आणि गोवंश संवर्धनासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे देशी गोवंशाचे संवर्धन, पशुपालकांचे उत्पन्न वाढविणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण पायाभरणी झाली.

**मा. ना. पंकजाताई मुंडे (ताईसाहेब) यांचे नेतृत्व** हे केवळ निर्णय घेणारे नाही, तर समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे नेतृत्व आहे. पर्यावरण संवर्धनासाठी हरित प्रशासन, देशी गोवंशाच्या संरक्षणासाठी ऐतिहासिक निर्णय आणि प्रशासन अधिक पारदर्शक करण्यासाठी राबविलेल्या सुधारणा या त्यांच्या कार्यशैलीतील दूरदृष्टी आणि लोकाभिमुख विचारांचे उत्तम उदाहरण आहेत. **मा. ना. पंकजाताई मुंडे (ताईसाहेब)** यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! आपल्याला निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी जीवन लाभो. महाराष्ट्राच्या विकासासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी, पशुसंवर्धनाच्या प्रगतीसाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी आपल्या नेतृत्वाखाली अशीच विकासाची वाटचाल अखंड सुरू राहो, हीच प्रार्थना.

**आजच्या या वाढदिवसाच्या निमित्ताने ताईसाहेब फक्त एवढेच लिहावे वाटते वादळांशी लढणं ज्यांच्या रक्तात आहे, अन्यायाशी भिडणं ज्यांच्या वृत्तीत आहे. रणांगण असो की जनतेचा दरबार, पंकजाताईंचा प्रत्येक निर्णय ठरतो महाराष्ट्राचा आधार.**

**वाघीण महाराष्ट्राची, संघर्ष त्यांचा श्वास, जनतेच्या विश्वासातून उभा राहिला त्यांचा इतिहास. मुंडे साहेबांचा वारसा जपताना घेतली विकासाची शपथ, म्हणूनच जनतेच्या हृदयावर आजही आहे त्यांचीच सत्ता आणि पकड.**

**ताईसाहेब आपणास वाढदिवसाच्या हार्दिक, मनःपूर्वक आणि कोटी-कोटी शुभेच्छा!**

**मिलिंद कांबळे, परळी वैजनाथ 9850974444**

## मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व ना.पंकजाताई मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त सिरसाळा गटात विविध सामाजिक उपक्रम

**सिरसाळा :** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व राज्याच्या पशुसंवर्धन,पर्यावरण आणि हवामान बदल या मंत्रालयांच्या कॅबिनेट मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सिरसाळा व परिसरातील गावात विविध ठिकाणी समाजोपयोगी सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला,

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सिरसाळा येथे भारतीय जनता पार्टी पश्चिम मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय वह्या, पुस्तके, पेन व पेन्सिल यांचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणारा हा सामाजिक उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला, यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

तसेच  तपोवन येथील श्री तपोवनेश्वर मंदिरात त्यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व निरंतर जनसेवेसाठी महाअभिषेक करण्यात



आला. तसेच उपस्थित भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवर व कार्यकर्त्यांनी मा. नामदार पंकजाताई मुंडे व मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि यशस्वी कार्यासाठी मनोभावे प्रार्थना केली.आज दिनांक २६ रोजी सिरसाळ्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सलग दोन दोन ते तिन दिवस हे सामाजिक उपक्रम भारतीय जनता पार्टी पश्चिम मंडळ अध्यक्ष मा. वसंतजी निर्मळ यांनी व  भारतीय जनता पार्टी पश्चिम मंडळ युवा मोर्चाचे अध्यक्ष मा. गोविंदरावजी कांदे, विक्रम मिसाळ, चंद्रकांत देवकते, संतोष धानोरकर, परमेश्वर जाधव, दिलीप राठोड, विकास पाळवदे, नामदेव गायकवाड, अविनाश देशमुख, अनिल उजगरे, गोविंद राठोड, आयुबभाई, पेंटर रोडगे, जलीलभाई, फारुख पठाण, बंडू राठोड, अविनाश राऊत, तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले आहे.

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध धार्मिक, सामाजिक सेवा उपक्रमांचे आयोजन

**परळी वैजनाथ |** महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज रविवार, दि. 26 जुलै रोजी परळी शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध सामाजिक, धार्मिक व जनहिताचे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दिवसभर शहरातील विविध ठिकाणी हे उपक्रम पार पडणार असून कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा परळी शहराध्यक्ष सौ. उमाताई चंद्रकांत समशेट्टे यांनी केले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिरात महाअभिषेकाने होणार आहे. त्यानंतर सकाळी ८.०० वाजता भीमनगर येथील सुगंधकुटी बुद्धविहारात बुद्ध वंदना, तर सकाळी ८.३० वाजता बंगला गल्ली येथील हुसेन शहावली दर्ग्यावर चादर अर्पण करण्यात येणार आहे.

सकाळी ९.०० वाजता उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळांचे वाटप करण्यात येईल. सकाळी ९.३० वाजता नंदागोळ रोडवरील गुरुकुल आश्रम येथे प्रितेश



तोतला यांच्या आयोजनातून होम-हवन व भोजनाचा कार्यक्रम होईल. सकाळी १०.३० वाजता श्रीराम (श्री बालाजी) मंदिरात अंजलीताई माळी यांच्या आयोजनातून अन्नपूर्णादेवी महारती व प्रसाद वितरण होणार आहे.

सकाळी ११.०० वाजता पॉवरलूम सोसायटी येथे पवन मुंडे व प्रितेश तोतला यांच्या आयोजनातून पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता नागसेन नगर येथील समाज मंदिरात निळकंठ चाटे यांच्या आयोजनातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा भेट देण्यात येणार आहे.

दुपारी १२.०० वाजता मा. ना. पंकजाताई मुंडे संपर्क कार्यालय येथे अश्विन मोगरकर यांच्या तर्फे वृत्तपत्र वितरकांना पावसापासून बचावासाठी रेनकोट वाटपाचा उपक्रम पार पडणार आहे.

या सर्व कार्यक्रमांना ज्येष्ठ नेते, प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख, महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह सर्व आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा परळी शहराध्यक्ष सौ. उमाताई चंद्रकांत समशेट्टे यांनी केले आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार, 26 जुलै 2026


## ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद; शालेय साहित्य वाटप, आरोग्य शिबिर, रक्तदान व खिचडी वाटप उपक्रम संपन्न

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक सेवा उपक्रमांच्या दुसऱ्या दिवशी विविध लोकोपयोगी कार्यक्रम उत्साहात पार पडले. सकाळपासून शहरातील विविध ठिकाणी शालेय साहित्य वाटप, खिचडी वाटप, सर्वरोगनिदान आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर तसेच नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना नागरिक, विद्यार्थी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी ९ वाजता श्री सरस्वती विद्यालय येथे नगरसेवक प्रणव मराठे यांच्या आयोजनातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यावेळी आनंद दिसून आला.





त्यानंतर सकाळी १० वाजता संदीपसेठ लाहोटी यांच्या आयोजनातून वैद्यनाथ मंदिर परिसरातील वैद्यनाथ प्रतिष्ठान येथे भाविकांना शाबुदाना खिचडी वाटप करण्यात आली.

यानंतर सकाळी १०.३० वाजता सर्वरोगनिदान आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. तसेच अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या कार्यक्रमाचे आयोजन मोहन जोशी व अनिष अग्रवाल यांच्या वतीने करण्यात आले.

सकाळी ११ वाजता राहुल केंद्रे यांच्या आयोजनातून पद्मावती गल्लीतील हनुमान मंदिर परिसरात नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात 374 नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली असून तर 34 रुग्णांचे मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुढील उपचार करण्यास अहिल्यानगर येथे नेण्यात येणार आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या या सामाजिक सेवा उपक्रमांमुळे समाजोपयोगी कार्याला चालना मिळत असून विविध उपक्रमांद्वारे गरजू नागरिकांना थेट लाभ मिळत आहे.

या या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके गुरुजी, माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, शांतीलाल जैन, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष सो उमाताई समशेट्टी, तालुकाध्यक्ष राजेश गीते, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, डॉक्टर शालिनीताई कराड, वैजनाथ ताटीपामल, भाऊराव भोईटे, राजकुवरबाई तोष्णीवाल मॅडम, बांधकाम सभापती पवन मुंडे, सभापती अंजली माळी, नगरसेविका सौ पूजाताई प्रितेश तोतला, नगरसेविका अश्विनीताई राहुल केंद्रे, वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रकाश जोशी, अनिल तांदळे, महेश आप्पा निर्मळे, अमोल डुबे, माजी नगराध्यक्ष अब्दुल करीम साहब, दलित आघाडी अध्यक्ष राहुल घोबाळे, व्यापारी महासंघाचे माऊली दादा फड, नंदकिशोरजी बियाणी, जगदीश लड्डा, नितीन अग्रवाल, केदार सारडा, योगेश जाजू, सचिन तोतला, रामानुज दरक, जगदीश मंत्री सुमित लाहोटी संजोग लाहोटी, सुरज पोरवाल, अरुण साबू, नंदू बियाणी, उद्धव फड, महादेव फडकरी, यश लाहोटी, बालाजी टाक, भारतीय जनता पार्टीचे नितीन समशेट्टे, सरचिटणीस अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, उपाध्यक्ष प्रशांत कराड, खालेद राज, चिटणीस अश्विनकुमार आघाव, युवा मोर्चा अध्यक्ष सुशील हरंगुळे, राहुल केंद्रे, योगेश पांडकर, गोविंद चौरे, विजयकुमार खोसे, केशव नागरगोजे, अच्युत जोगदंड, उमेश निळे, दिलीप नेहरकर, श्रीपाद शिंदे, राजेश ताटीपामल, बाळू शहाणे, दयानंद आघाव, प्रीतम बोरा, कोंडीबा टोमके, प्रदीप होळंबे, राका भाभी, सय्यद शेरू, राजेश बुंदीले, प्रदीप मुंडे सर, राम तोष्णीवाल, आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानोबा सुरवसे तसेच आभार प्रदर्शन अनिश अग्रवाल यांनी केले.





